केवळ खाजगी वितरणाकरिता
खंड ४ अंक ६ नोव्हेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
India ECHOES ONE WORLD ONE HUMANITY







# पूज्य गुरुदेवांच्या उत्तराधिकाऱ्याची नेमणूक

## कोलकाता ३ ऑक्टोंबर २०११

### पूज्य गुरुदेवांनी मिशनच्या कार्यकारी मंडळ व काही निमंत्रितांसमोर दिलेला संदेश

मी जसे आज म्हणत होतो, मला माझ्या उत्तराधिकाऱ्याची नेमणूक करावयाची आहे – नामनिर्देशन व नेमणूक. कारण मी आता पंच्याऐंशी वर्षाचा झालो आहे आणि हे करण्याची ही योग्य वेळ आहे हे आपण सर्वजण मान्य कराल. या निर्णयाला पूज्य बाबूजी महाराजांचा आशीर्वाद लाभला आहे व मला हे नामनिर्देशन लिखित स्वरुपात एका गोपनीय दस्तावेजाच्या स्वरूपात– जो योग्यवेळी उपयोगात आणला जावा – करण्याची सूचना तर मिळाली आहेच पण त्याचबरोबर याची घोषणा जाहीरपणे करण्यास देखील सांगण्यात आले आहे, जेणेकरुन सर्वांना त्या व्यक्तिची सवय होईल व ती व्यक्ति माझी प्रतिनिधी आहे हे वास्तव देखील स्विकारले जाईल. जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा हा बदल आकस्मिक नसेल जे मला वाटते शहाणपणाचे असेल. माझ्याजवळ लेखी दस्तावेज देखील आहे व मी नंतर कोणालातरी तो वाचावयास सांगेन.

ज्या व्यक्तीच्या खांद्यांवर या अवघड जबाबदारीचे ओझे येणार आहे त्याच्याकडे खूपसे शहाणपण, बरीचशी सहनशीलता, मोठ्या प्रमाणात प्रेम व या सर्वांपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कुठलीही गोष्ट विचारपूर्वक करण्याची क्षमता असणे गरजेचे आहे. साधारणपणे आपल्याला सांगितले जाते की 'झेप घेण्यापूर्वी लक्षपूर्वक बघितले पाहिजे' किंवा 'काहीही करण्यापूर्वी दोनदा विचार करा' पण सहजमार्गामध्ये मला वाटते की आपल्याला दोनपेक्षा कित्येक पटीने अधिक वेळा विचार करण्याची गरज आहे आणि सर्वात जास्त काळजी घेतली पाहिजे ती पैसे खर्च करतांना; – आपल्याला या गोष्टीची जाणीव असली पाहिजे की आपण जे पैसे खर्च करीत आहोत ते लोकांचे पैसे असून लोकांच्या कल्याणासाठी आपल्याकडे सोपविलेले आहेत. ज्या व्यक्तिचे नाव मी घोषित करणार आहे त्या व्यक्तीकडे हे गुण जर नसतील तर त्याला ते आत्मसात करावे लागतील. आतमध्ये निर्भय तर बाहेरुन मैत्रीपूर्ण व बंधूभावाने परिपूर्ण. आणि बाबूजींचा तो उपदेश पाळावा लागेल, जो त्यांनी मला दिला व मी माझ्या जीवनात तो कसोशीने पाळला– कुणावरही विश्वास ठेऊ नये, कुणावरही अविश्वास दाखवू नये. काम करण्याकरिता ज्या लोकांची निवड केली आहे त्यांचे त्यांच्या कामावरुन मूल्यमापन करावे, त्यांच्या कामाचे जे परिणाम असतील त्यावरुन त्यांना ठेवायचे की जबाबदारीतून मुक्त करायचे याचा निर्णय घ्यावा. कुठल्याही प्रकारचा पूर्वग्रह ठेवू नये– वंश, जात, धर्म, लिंग, समाज, भाषा यापैकी काहीही नाही.

तर जो कोणी या ओझ्याला आपल्या खांद्यावर घेणार आहे त्याने हे पूर्णपणे समजून घेतले पाहिजे. माझे गुरुदेव त्याला उदंड आयुष्य, आरोग्य, शक्ती व धैर्य देवोत ज्याची त्याला नितांत आवश्यकता आहे. कारण जेव्हा मिशनची जबाबदारी माझ्याकडे आली तेव्हा मिशन खूपच लहान होते पण मी गेल्यावर जी व्यक्ती ही जबाबदारी घेणार आहे त्याच्याकडे विशाल असे व संपूर्ण जगभरात पसरलेले मिशन चालविण्याची जबाबदारी असेल. मिशन अजूनही विस्तार पावत आहे व जर बाबूजींचे संदेश गंभीरपणे घेतले तर उत्तरोत्तर वाढत जाणार आहे. आपण सध्या विस्ताराच्या टप्प्यावर आहोत व ही अवस्था कधीपर्यंत असेल हे मी सांगू शकत नाही. हे दैवी योजनेवर अवलंबून आहे.

तर माझा वारस म्हणून मी ज्या व्यक्तीच्या नावाची घोषणा करणार आहे ते आहेत श्री. कमलेश पटेल.

...मी जगभरातील सर्व अभ्यासींना विनंती करतो की त्यांनी नामनिर्देशीत प्रतिनिधीला कुठलाही पूर्वग्रह न बाळगता आपले संपूर्ण सहकार्य द्यावे. ते काय होते किंवा ते कसे असावे यावरुन त्यांचे मूल्यमापन न करता त्यांच्या कामावरुन, ते काय आहेत, ते काय होतील व ते काय करतील यावरुन त्यांचे मूल्यमापन करावे. मिशनच्या स्वास्थ्यासाठी व भविष्यातील प्रगतीसाठी, ज्याचा दुसरा अर्थ या मिशनच्या माध्यमातून ते आपणा सर्वांची जी सेवा करणार आहेत, त्यासाठी आपले हृदयापासूनचे संपूर्ण सहकार्य त्यांना मिळणे आवश्यक आहे व याचसाठी मी आपणा सर्वांना विनंती करीत आहे.

आपणा सर्वांना आशीर्वाद लाभोत.

खंड ४ अंक ६ नोव्हेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

# गुरुदेवांचा प्रवास

## दिल्ली १६ ते १८ ऑगस्ट २०११




१६ ऑगस्ट रोजी सायंकाळी साधारण ५:३० वाजता गुरुदेवांचे चेन्नईहून विमानाने दिल्ली येथे आगमन होताच सर्व अभ्यासींना खूप आनंद झाला. विमानतळावर जवळ जवळ १०० अभ्यासींनी त्यांचे हार्दिक स्वागत केले. गुरुदेव तेजस्वी व उल्हसित दिसत होते. आपला प्रवास कसा झाला असे विचारल्यावर ते हसून उत्तरले, "प्रवास हा आपल्या संस्कारांप्रमाणे सहन केला पाहिजे." छोट्या कार प्रवासानंतर गुरुदेव एका अभ्यासी बंधुंच्या घरी पोहोचले व तेथे उपस्थित असलेल्या अभ्यासींसाठी एक सत्संग घेतला. संपूर्ण संध्याकाळ ते आनंदी मनस्थितीत होते. जेवणानंतर जेव्हा त्यांना पूज्य बाबुजींची नात प्रसुत होवून तिने कन्येला जन्म दिल्याची बातमी समजली, तेव्हा ते म्हणाले की त्यांना चेन्नई ते दिल्ली दरम्यानच्या विमान प्रवासातच तशी जाणीव झाली होती व त्यांनी 'देवयानी' असे नाव त्यांच्या प्रिय गुरुदेवांच्या पणतीसाठी ठरविले होते.

दुसऱ्या दिवशी गुरुदेवांनी सकाळी सत्संगाचे संचालन केले व दुपारी दिल्लीतील आश्रमच्या जागेच्या पहिल्या टप्प्यातील नोंदणीकरणासाठी प्रस्थान केले. नोंदणीकरणानंतर गुरुदेवांनी उपस्थितांशी प्रेमळपणे बातचीत केली व प्रसाद वाटला. सायंकाळी ६:३० वाजता सत्संग झाला. जेवणानंतर गुरुदेवांनी आपल्या नेहमीच्या कल्पक व विनोदी स्वभावाने सर्वांना सतत हसवत ठेवले व ते टी.टी.के समुहासाठी काम करत असतानाच्या आठवणी सांगितल्या. त्यावेळी ते म्हणाले, "प्रेमासारखे, प्रामाणिकपणा हा देखील एक दिशा मार्ग आहे व प्रामाणिकपणाचे बक्षीस म्हणजे प्रामाणिक राहण्याची क्षमता वाढणे हेच होय."

दि. १८ ऑगस्ट रोजी गुरुदेव काही अभ्यासींशी बातचीत केल्यानंतर दुपारी हैद्राबादला रवाना झाले.

## हैद्राबाद १८ ते २३ ऑगस्ट

हैद्राबादला आगमन होताच गुरुदेव 'कान्हा शांती वनम' प्रकल्पाच्या नोंदणीकरणाच्या औपचारिकता पूर्ण करण्यासाठी गाचीबोवलीला गेले. बंधू श्रीनिवासराव कशामपुरकर ह्यांना बघताच गुरुदेवांना आनंद झाला. ते गुरुदेवांपेक्षा चार वर्ष मोठे असून गुरुदेव प्रशिक्षक झाल्यानंतर त्यांच्या मार्फत झालेले ते पहिले अभ्यासी होते. गुरुदेवांनी अगदी प्रेमपूर्वक त्यांच्याशी बातचीत केली. जेवणानंतर जेवणमेजापाशी सगळी लहान मुले जमली व आपल्या मास्टर आजोबांना त्यांनी विनोद ऐकविले. गुरुदेवांनी देखील स्वत: काही विनोद सांगून त्यांना प्रतिसाद दिला.



१९ ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्संगानंतर गुरुदेव कान्हा प्रकल्पाच्या चमुला भेटले व त्यांनी कागदपत्रांचा आढावा घेतला. न्याहरीनंतर उपस्थितांशी बोलत होते तेव्हा त्यांनी एका भगिनीला आदल्या दिवशी ती कोठे होती म्हणून विचारले. ती उत्तरली की त्या वेळी ती चांगल्या मनस्थितीत नव्हती. तेव्हा गुरुदेवांनी तिला परत विचारले की ती त्यांच्यावर रागावली आहे काय? ते पुढे म्हणाले की बाबुजींनी त्यांना एकदा सांगितले होते की तुम्ही तुमच्या पतीवर, पत्नीवर, मुलावर, अथवा मुलीवर रागावू शकत नाही, पण तुम्ही तुमच्या गुरुदेवांवर रागावू शकता कारण तो एकच असा राग आहे ज्यातून प्रतिक्रियास्वरूप उलट राग प्रेषित होणार नाही.

२० ऑगस्टला सकाळी न्याहरी नंतर गुरुदेवांनी कान्हा शांती वनमकडे प्रस्थान केले. तेथील भूमी स्वच्छ करून त्या भोवती कुंपण घालून तेथे पपया, मका व भाताची लागवड केलेली आहे. एका झाडाभोवती एक छोटीशी कुटी बांधण्यात आली आहे. गुरुदेव तेथे बाहेर बसले व जागेच्या नकाशाचा आढावा घेतला. गुरुदेवांनी त्या जागेवर पहिला सत्संग घेतला व ह्यापुढे नियमित रविवारचे सत्संग तेथे घेण्यास अनुमतीही दिली. त्यांनी संपूर्ण जागेभोवती एक फेरी मारली आणि जागा सुव्यवस्थित राखल्याबद्दल प्रशंसा केली. त्यानंतर ते बंधू मधू कोथोपल्ली ह्यांच्या निवासस्थानी भोजन व विश्रांती साठी परत गेले.

आश्रमात झाण्यासाठी गुरुदेव खूप बेचैन झाले होते आणि ३:३० वाजताच त्यांनी विभागीय आश्रमाकडे प्रस्थान केले आणि सायंकाळी ६ वाजता तेथे पोहोचले. ४००० अभ्यासींनी त्यांचे आनंदाने स्वागत केले. कोणीतरी अनुशासनाबद्दल टिप्पणी केली तर ते हसत म्हणाले की ह्या टप्प्या पर्यंत यायला त्यांना बराच वेळ लागला. ते जसजसे व्यासपिठाचा मार्ग चढू लागले तसतशा मुलांनी मोठ्याने ओरडुन शुभेच्छा दिल्या. गुरुदेव वळाले व त्यांना लक्षात ठेवायला सांगितले की सहज मार्ग आपल्याला शांततेत राहण्यास शिकवतो.

२१ ऑगस्ट रोजी गुरुदेवांनी सकाळचा व संध्याकाळचा ही सत्संग खचाखच भरलेल्या ध्यानकक्षे मध्ये घेतला.
संध्याकाळी मुलांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम व कथ्थक नृत्याचा कार्यक्रम झाला.

दि. २२ ऑगस्ट रोजी गुरुदेवांनी सकाळी ७:३० वाजता सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर भजनांचा कार्यक्रम झाला. "प्रार्थना करण्याची अचूक पद्धत काय?" ह्या एका भगिनीच्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, "ज्या व्यक्तिसाठी तुम्हाला प्रार्थना करायची आहे तिला आपल्या हातांमध्ये





एखाद्या तान्ह्या बालकाप्रमाणे पकडा, तिला गुरुदेवांच्या समोर प्रस्तुत करा आणि फक्त म्हणा, 'ह्या व्यक्तिची काळजी घ्या' आणि हीच पद्धत आहे सहजमार्गामध्ये प्रार्थना करण्याची." सायंकाळच्या सत्संगानंतर भगिनी सौम्याने एक नृत्य प्रस्तुत केले.

दि.२३ रोजी पूज्य गुरुदेवांनी विमानतळाकडे प्रयाण केले. तेथे एका अभ्यासीने त्यांना विचारले, "केवळ जमिनीच्या नोंदणीसाठी इतका प्रवास करणे खरोखरच गरजेचे होते का? कारण कोणाला तरी अधिकार देऊन ते काम करता आले असते." त्यावर गुरुदेव उत्तरले की त्यांना सर्व अभ्यासींना भेटायला आवडते म्हणून ते तेथे आले.

## दिल्ली २३–३० ऑगस्ट २०११

दि.२३ रोजी सायंकाळी गुरुदेव दिल्लीस परतले. विमानतळावर अभ्यासींनी त्यांचे उत्साहपूर्वक स्वागत केले. ते नेहमी प्रमाणेच प्रसन्न दिसत होते. गुरुदेवांच्या सान्निध्यात दिवस कसे भुरकन उडुन गेले ते कोणालाही समजले नाही. अभ्यासींना गुरुदेव त्यांच्या कार्यालयात अथकपणे काम करताना दिसत होते, अभ्यासींशी संवाद साधत, सत्संगांचे संचालन करीत, त्यांच्याकडील आध्यात्मिक धन वाटत, त्यांच्या गुरुदेवांचे संदेश पोहोचवत होते व त्यांच्या कृपेचा वर्षाव सर्वांवर करीत होते.

दि.२७ ऑगस्ट रोजी गुरुदेव गुडगांव आश्रम येथे गेले व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या अभ्यासींसाठी त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी सत्संग संचालित केला. त्यानंतर अभ्यासींच्या भेटीगाठी घेतल्या व अर्ध्या डझनहुन अधिक नवजात बालकांचे नामकरण केले. दुपारनंतर ते दिल्ली येथे परतले.

दि.२९ ऑगस्ट रोजी गुरुदेव नवी दिल्ली येथील आश्रमाच्या जागेच्या दुसऱ्या टप्प्यातील नोंदणीकरणासाठी गेले. त्यांच्या गुरुदेवांचे काम करताना त्यांना वाटणारा आनंद व उत्साह स्पष्टपणे जाणवत होत. घरी परतल्यानंतर एक अभ्यासी बंधू म्हणाला की दुसऱ्या टप्प्याचे नोंदणीकरण पूर्ण झाल्यामुळे त्यांना अत्यंत आनंद वाटत असेल. त्यावर गुरुदेव हसत उत्तरले, "हे तर भविष्यकाळासाठी आहे, परंतु वर्तमानकाळाकरिता मला आणखी पुष्कळ काही करावयचे आहे." त्यानंतर लगेचच त्यांनी तेथे जमलेल्या सर्वांसाठी सत्संग संचालित केला.

## चेन्नई ३० ऑगस्ट ते ३० सप्टेंबर

दि. ३० ऑगस्ट रोजी गुरुदेवांचे दिल्लीहून चेन्नई येथे आगमन झाले. ३१ तारखेला गुरुदेवांनी सकाळी कुटीरामध्ये जमलेल्या अभ्यासींसाठी सत्संग संचालित केला. सत्संग झाल्या झाल्या तत्काळच एका अभ्यासी युगलाने रमजान असल्यामुळे पुन्हा एक सिटिंग देण्याची विनंती केली. त्यावर गुरुदेव म्हणाले की त्यांनी आत्ताच एक सिटिंग दिली आहे व त्यांना थकवा जाणवायला लागला आहे. ते क्षणभर थांबले व म्हणाले की पाच मिनिटांनंतर ते त्यांना सिटिंग देतील. यावरुन दिसून येते की गुरुदेव स्वत:ची कितीही गैरसोय झाली तरी त्याकडे दुर्लक्ष करुन अभ्यासींच्या विनंतीला मान देतात.

संपूर्ण सप्टेंबर महिना गुरुदेव चेन्नई मध्येच राहिले व त्यातील बहुतांश वेळ ते मणपक्कम येथेच होते. ते रोज संध्याकाळी त्यांच्या शयनकक्षातून कुटीराच्या मागील दरवाज्याने बाहेर येऊन थोडा फेर–फटका मारून कुटीराच्या पुढील भागात येऊन बसत. दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ७:०० वाजता गुरुदेवांनी वापरासाठी सज्ज झालेल्या नवीन वाचनालयाचे उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी आशीर्वादपूर्वक प्रसाद वाटला व वाचनालय स्वयंसेवकांच्या ताब्यात दिले. 'गार्डन ऑफ हार्टस' मधील अभ्यासींनी २५ सप्टेंबर रोजी तळघरात आयोजित केलेल्या रात्रीच्या भोजनाचे आमंत्रण गुरुदेवांना दिले होते. तेथे जमलेल्या अभ्यासींना उद्देशून गुरुदेवांनी एक भाषण केले. त्यामध्ये मुख्यत: पालकांना उद्देशून त्यांनी आपल्या मुलांचे संगोपन कसे करावे या विषयी मार्गदर्शन केले. मिशनच्या वेबसाईटवर लवकरच हे भाषण उपलब्ध करण्यात येईल.



खंड ४ अंक ६ नोव्हेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र



## कोलकाता – ३०सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर २०११

दि. ३० सप्टेंबर रोजी दुपारी ३:४० वाजता पूज्य गुरुदेवांचे कोलकाता येथे आगमन झाले. गेल्या दीड वर्षांपासून गुरुदेवांच्या प्रतीक्षेत असणाऱ्या अभ्यासींनी गुरुदेवांचे प्रेमपूर्वक व भावूक अंत:करणाने स्वागत केले. ३ ऑक्टोबरपर्यंत आश्रमात जवळजवळ १५०० अभ्यासी जमले होते. दि. १ व २ ऑक्टोबरला सकाळच्या सत्संगाचे संचालन गुरुदेवांनी केले.

गुरुदेवांच्या भेटीचे औचित्य साधून भारताच्या पूर्व विभागासाठी 'जी.एस.टी. (जागतिक सेवा संघाची) ओळख' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये केंद्रप्रमुख, विभाग–प्रमुख आणि काही प्रशिक्षकांचा सहभाग होता. ही कार्यशाळा १ आणि २ ऑक्टोबर रोजी घेण्यात आली. त्या–त्या विभागाच्या कार्यप्रमुखांनी सहभागी अभ्यासींना जी.एस.टी.च्या कार्याबद्दल माहिती दिली.

दि. २ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी लहान मुलांनी कव्वाली आणि भगिनींनी गरबानृत्य सादर केले. गुरुदेवांनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला व ते समूहफोटो काढण्यास तयार झाले. स्वयंपाकगृहातील स्वयंसेवकांचे त्यांच्यासोबत भोजनकक्षात जेवण करण्याचे आमंत्रणदेखील त्यांनी स्वीकारले. सर्व अभ्यासींसाठी ती संध्याकाळ अत्यंत प्रसन्न आणि अविस्मरणीय ठरली.

दि. ३ ऑक्टोबरच्या सकाळी गुरुदेवांनी स्वत: मिशनच्या कार्यकारिणीच्या बैठकीचे संचालन केले. त्यानंतर त्यानी बंधू कमलेश पटेल यांना आपला आध्यात्मिक उत्तराधिकारी म्हणून जाहीर केले. तसेच त्यांच्या जीवितकार्यानंतरचे मिशनचे प्रमुख म्हणूनही घोषित केले. यानंतर लगेचच त्यांनी जगभरातील अभ्यासींसाठी या संदर्भातील व्हिडिओ संदेशही ध्वनिचित्रमुद्रित केला. संध्याकाळी ५ वाजता गुरुदेवांनी सत्संगाचे संचलन केले. व नंतर उपस्थित अभ्यासींना बंधू कमलेश पटेल यांची ओळख करून दिली.

दि. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी बंधू कमलेश पटेल यांनी सत्संगाचे संचलन केले.गुरुदेव बंधू अजय भट्टर यांच्या घरी निघाल्यानंतर बंधू कमलेश पटेल यांनी 'साधनेचे महत्त्व' याविषयावर भाषण दिले. गुरुदेव बंधू अजय भट्टर यांच्या घरी ८ऑक्टोबरपर्यंत राहिले व नंतर त्यांनी गुवाहाटीकडे प्रयाण केले.



## ८ ते १० ऑक्टोबर २०११ – गुवाहाटी

जवळजवळ १८ वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर गुरुदेव गुवाहाटीला येत असल्याने पूर्व विभागातील अभ्यासी त्यांची आतूरतेने प्रतीक्षा करीत होते. दि.९ ऑक्टोबरचा दिवस गुरुदेवांनी हिरव्यागार झाडीने वेढलेल्या आणि डोंगरांचे रमणीय दृष्य असणाऱ्या झोनल आश्रमाच्या प्रस्तावित जागी व्यतीत केला. ही जागा शहरापासून २५ किमी अंतरावर आहे. पारंपारिक 'बिहू नृत्याने गुरुदेवांचे स्वागत करण्यात आले.

सत्संगानंतर ईशान्येकडील सात राज्यांनी पारंपारिक पद्धतीने गुरुदेवांचे स्वागत केले. त्यांच्या भाषणात त्यांनी या सात राज्यांची तुलना संगीतातील सात स्वरांशी करून त्यांच्या सौंदर्याचा उल्लेख केला. ते म्हणाले की, केवळ एका स्वराने संगीत साकारत नाही. सात स्वरांपैकी प्रत्येक स्वर महत्त्वाचा आहे. आपण वेगवेगळ्या प्रांतातून वेगवेगळ्या संस्कृतीतून आलेलो असलो तरीही, आपली भाषा वेगवेगळी असली तरीसुद्धा आपले लक्ष्य एकच आहे आणि म्हणूनच आपल्यामध्ये आंतरिक एकतेची भावना असली पाहिजे. सत्संगानंतर गुरूदेवांनी नोंदणीकामाची औपचारिकता पूर्ण केली. संध्याकाळच्या सत्संगानंतर गुरूदेवांनी झोनल आश्रमाचे 'ज्योती' असे नामकरण केले आणि रविवारचा सत्संग ह्याच जागी करण्याबाबत सूचना दिली.
१० तारखेस पूज्य गुरुदेवांनी गुवाहाटी शहर आश्रमातील ध्यान–कक्षाचे उद्घाटन केले. त्यांनी सत्संगाचे संचालन केले व सर्व उपस्थित अभ्यासींना संबोधित केले. या वेळी ते म्हणाले, "साधना हा जीवन जगण्याचा मार्ग आहे. ती आपल्या श्वासोच्छवासाप्रमाणे आहे. आपले भौतिक शरीर टिकण्यासाठी जशी अन्नाची गरज असते; तसेच आध्यात्मिक शरीराचे अन्न म्हणजे प्राणाहुती आहे. जरआध्यात्मिक शरीराची योग्य काळजी घेतली नाही तर आत्म्याचा मृत्यु होतो."



खंड ४ अंक ६ नोव्हेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र



## दिल्ली १०–१३ ऑक्टोबर २०११


दि. १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता पूज्य गुरुदेवांचे गुवाहाटीहून दिल्ली येथे आगमन झाले. यावेळी सुमारे १०० अभ्यासी त्यांच्या स्वागताकरिता उपस्थित होते. उत्साही व आनंदी मनस्थितीत असणाऱ्या गुरुदेवांनी सर्वांना अभिवादन केले. एका अभ्यासी बंधूच्या निवासस्थानी भोजनोत्तर आपल्या नेहमीच्या हजरजबाबीपणा व वाक्पटुत्वामुळे त्यांनी सर्वांची मने जिंकून घेतली.

दुसऱ्या दिवशी दुपारी ४ वाजता गुडगाव आश्रम येथे पोचल्यावर बाहेरील हिरवळीवर बसून गुरुदेवांनी सुमारे अर्धा तास उपस्थितांशी वार्तालाप केला. हिरवळीवर उभारलेल्या पुतळ्याबद्दल विचारले असता ते म्हणाले की तो पुतळा द्रोणाचार्यांचा असून 'गुडगाव' हे नाव 'गुरु–ग्राम' यावरुन तयार झाले आहे. (गुडगाव हे द्रोणाचार्यांचे गाव आहे अशी आख्यायिका आहे.) याच वार्तालापादरम्यान त्यांनी आपले उत्तराधिकारी बंधू कमलेश पटेल यांची उपस्थितांना ओळख करुन दिली व त्यानंतर सत्संगाचे संचालन केले.

दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता गुरुदेवांचे ध्यान–कक्षामध्ये आगमन झाले. सत्संगासाठी येणाऱ्या अभ्यासींची वाट बघत असताना त्यांनी एक लहानसे भाषण केले. योग्य पद्धतीचे महत्त्व व साधनेकडे पाहण्याचा दृष्टीकोण यावर त्यांनी भर दिला. बंधू कमलेश पटेल यांचा उपस्थितांना परिचय करुन दिल्यानंतर त्यांनी आपल्या भाषणाची सांगता केली. सत्संगानंतर त्यांनी दोन विवाह संपन्न केले. दि. १३ ऑक्टोबर रोजी गुरुदेव पहाटे ६.३० वाजता तयार होते. सत्संगानंतर ८ वाजता, न्याहारीनंतर त्यांनी विमानतळाकडे जाण्यासाठी प्रस्थान केले.

## दुबई

दुपारी १.१५ वाजता पूज्य गुरुदेवांचे दुबई येथे आगमन झाले व बंधू संजय मेहेरिश यांच्या घरी ते दुपारी २.१५ वाजता पोहोचले. गुरुदेव यावेळी प्रसन्न मनस्थितीत होते. दिल्ली येथील अनेक अभ्यासी त्यांच्या बरोबर होते. संपूर्ण जगभरातून शेकडो अभ्यासी तेथे जमा होत होते. १४ ऑक्टोबर पर्यंत यु.ए.ई., कुवैत, इराण, बहारिन, ओमान, पाकिस्तान, भारत, आफ्रिका, यु.एस.ए. अशा सुमारे २५ देशातील १०५० अभ्यासी त्या ठिकाणी जमले होते. दि. १४ रोजी गुरुदेवांनी 'बदलाकरिता प्रार्थना करा–स्वत:च बदल बना' या अधिवेशनाचे उद्घाटन केले व त्यानंतर बंधू कमलेश पटेल यांची




उपस्थितांना ओळख करुन दिली.

दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळच्या सत्संगानंतर प्रशिक्षकांच्या बैठकीमध्ये गुरुदेवांनी जी.एस.टी. (वैश्विक सेवा संघ) ची ओळख करून दिली. यावेळी ते म्हणाले की बाबूजींच्या काळातील लहान, साध्या–सोप्या संस्थात्मक रचनेपासून मिशन आता बरेच पुढे आले आहे.

"...मी पुन्हा एकदा आपणास सांगू इच्छितो की माझे आपल्याप्रति कर्तव्य एखादा दिवा लावण्यासारखे आहे. तो तसाच प्रज्वलित ठेवणे, त्याला तेल–पाणी करणे, त्याची वात व्यवस्थित ठेवणे हे तुमचे काम आहे.आपल्या वैश्विक सेवा गटाला केवळ आजच नव्हे, तर भविष्यातही तुम्ही १०० टक्के सहकार्य करावे अशी माझी प्रार्थना आहे. हा गट तुमच्यावर हुकूमशाही गाजवण्यासाठी नाही किंवा शिकवण देण्यासाठी नाही तर तुमच्या जर काही समस्या असतील तर त्या परस्पर सामंजस्याने सोडविण्याकरिता आहे. म्हणूनच त्याला 'सेवा गट' असे म्हटले आहे. कसे उत्तर शोधावे, काय करावे, माझा भारतातील काय अनुभव आहे? तुमचा ईराणमधील काय अनुभव आहे? त्यांचा टिंबक्टूमधला काय अनुभव आहे? इत्यादि. ही केवळ एक आदान–प्रदानाची सोय आहे–कामाचे आदान–प्रदान, कामातून येणाऱ्या अनुभवांचे आदान–प्रदान आणि सार्वत्रिक सुधारणा करण्यासाठी भविष्यात काय करता येईल याकरिता हा गट आहे."

यु.ए.ई. व इराण येथील अभ्यासींची गुरुदेवांनी भेट घेतली. त्यांच्याबरोबर वार्तालाप करताना ते म्हणाले, "हवेसे वाटणे व प्रेम करणे यात मोठा फरक आहे. मला गुरुदेव हवेसे वाटतात. कशासाठी? पण जेव्हा मी गुरुदेवांवर प्रेम करतो तेव्हाच मी आज्ञापालन करतो. याचा अर्थ, सहज–मार्गामध्ये आज्ञापालन हे कुठल्याही नियमांमुळे जसे दहा नियमांमुळे येत नाही. आम्ही प्रेम करतो, म्हणून आम्ही आज्ञापालन करतो. ते हृदयापासून येते, मेंदूपासून नाही. आज्ञापालन हे प्रेमातून येते, भीतीतून नाही."

दि. २२ ऑक्टोबर रोजी गुरुदेव मुंबईला जाण्याकरिता रवाना झाले व दि. २५ रोजी मुंबईहून अहमदाबाद येथे जाण्यास निघाले.

# संपूर्ण दिवसीय कार्यक्रम




## विरुधुनगर– तामिळनाडु

प्रादेशिक समन्वयक बंधू एन. प्रकाश व बंधू टी. व्ही. विश्वनाथ राव यांनी चिन्नवल्लीकुलम आश्रमास दि. २१ ऑगस्ट रोजी भेट दिली. या संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमास चिन्नवल्लीकुलम, अरुप्पुकोट्टई, करियापट्टी, कोविलपट्टी, श्रीवल्लीपुत्तूर, राजपालयम व शिवकासी येथील सुमारे पन्नास बंधू–भगिनी सहभागी झाले होते.

सकाळच्या सत्संगानंतर बंधू एन. प्रकाश यांनी एक प्रेरणादायी भाषण केले. न्याहारीनंतर 'उत्तम प्रतीचे अभ्यासी' या विषयावर घेण्यात आलेल्या गट–चर्चेत अनेक मुद्द्यांचा परामर्ष घेण्यात आला. कित्येक अभ्यासींनी अनेक प्रसंगी गुरुदेवांची उपस्थिती व मार्गदर्शन अनुभवास आल्याचे संगितले. संध्याकाळच्या सत्संगाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## गुवाहाटी

युवकांच्या अथक प्रयत्नांनंतर दि. ३ सप्टेंबर रोजी गुवाहाटी केंद्रामध्ये एक पूर्ण दिवसीय कार्यक्रम झाला. सकाळच्या सत्संगानंतर एकोज इंडिया वार्तापत्राच्या सप्टेंबर अंकामधील ठळक बाबींबद्दल एक सादरीकरण दाखविण्यात आले. न्याहारीनंतर साधनेबद्दलच्या शंका–निरसनाचे सत्र नवीन अभ्यासींकरिता संचलित करण्यात आले. या वेळी असे निदर्शनास आले की जुन्या अभ्यासींना देखील त्यांच्या रोजच्या साधनेबाबत काही गोष्टींच्या खुलाशाची गरज होती. एस.एम.एस.एफ. ने तयार केलेल्या स्लाईड्सच्या माध्यमातून सादर केलेला हा कार्यक्रम विचारांना चालना देणारा होता. त्याचा उपस्थितांना फायदा झाला. यानंतर वातावरण हलके–फुलके ठेवण्यासाठी उपस्थितांना प्रश्नोत्तर सत्रांमध्ये गुंतविण्यात आले. यावेळी अल्पोपाहार व ४ वाजता सत्संग झाला.

## त्रिशूर

दि. ४ सप्टेंबर रोजी ओणमच्या दिवशी योगाश्रम, त्रिशूर येथे दिवसभराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'हृदयातील शाश्वत ज्योत' व 'मानवतेचे भविष्य बदला' ही गुरुदेवांची भाषणे या



वेळी ऐकवण्यात आली. केंद्र–प्रमुख बंधू टी.एन. नारायण व बंधू जयप्रकाश यांनी अभ्यासींकरिता त्यांचे मल्याळममध्ये भाषांतर केले. नुकताच कार्यरत झालेला 'जागतिक सेवा संघ (ग्लोबल सर्विस टीम)',मिशनचे कार्यक्रम, सतखोल आश्रम व क्रेस्ट रिट्रीट सेंटर यांना भेट देण्याचे महत्त्व याबाबतची माहिती सर्वांना देण्यात आली. अर्ध्या तासाकरिता बहुमोल मौन पाळण्यात आले.

## देवकोट्टई – तामिळनाडु



रामनाथपुरम, परमकुडी, मनमदोरे व शिवगंगई या केंद्रांतील सुमारे एक्क्याऐंशी अभ्यासी देवकोट्टई येथील कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी दहा वाजता 'ओपन हाऊस' सत्राने झाली. बंधू एस. मारिया सेल्वराज यांनी स्वागतपर भाषण केले. यामध्ये सुमारे पंचावन्न स्थानिक व्यक्ति सहभागी झाल्या होत्या. त्यांना मिशनच्या कार्यक्रमांची माहिती देण्यात आली. सहभागी झालेल्या केंद्रांच्या प्रशिक्षकांनी 'मनुष्यजन्माचा उद्देश', 'धर्म', 'सद्गुरुंची भूमिका', 'साधनेचे महत्त्व', 'अभ्यासींची भूमिका' व 'सहज–मार्ग ध्यानाची आवश्यकता' या विषयांवर भाषणे केली. दुपारच्या सत्रात अभ्यासींनी आपल्या अनुभवांची देवाण–घेवाण केली. संध्याकाळच्या सत्संगाने या कार्यक्रमाची सांगता झाली.



## सेवेद्वारा प्रगती, मुंबई

सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्याच्या प्रत्येक आठवड्याच्या शेवटी सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.३० च्या दरम्यान मुंबईतील विविध ठिकाणी 'सेवेद्वारा प्रगती' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक ठिकाणी सरासरी वीस अभ्यासी उपस्थित होते. अभ्यासींना प्रेरणा देणे, मिशनमधील स्वयंसेवी कामांबद्दल माहिती देणे, सेवेकरिता योग्य मनोवृत्ती तयार करणे व कामाकरिता मार्गदर्शनपर माहिती देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

दि. ११ सप्टेंबर रोजी जळगाव येथे झालेल्या कार्यक्रमास जळगाव व जवळपासच्या केंद्रातील सुमारे ३० अभ्यासी उपस्थित होते. कार्यक्रमाची माहिती देणाऱ्या स्लाईड्स इंग्रजीमध्ये होत्या परंतु निवेदन हिंदी व मराठी भाषेत केले जात होते. अभ्यासींचा उत्साहपूर्ण सहभाग असणाऱ्या या कार्यकमाची सांगता सत्संगाने झाली.

## आंतरराष्ट्रीय शांती दिन, गुजरात

दि. २१ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय शांती दिनाचे औचित्य साधून गुजरातमधील २९ ठिकाणी प्रार्थना–सभांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुमारे ५२५ अभ्यासी व १६०० इतर व्यक्ति सहभागी झाल्या होत्या. जामनगर येथे एकूण ४ ठिकाणी या सभा आयोजित केल्या गेल्या होत्या, त्यात अभ्यासींसह ४०० व्यक्तींचा सहभाग होता. भावनगर येथे २०० तर पोरबंदर येथे ५० व्यक्तींनी यात भाग घेतला. कडी येथे एका शाळेमध्ये आयोजित केलेल्या प्रार्थनसभेत सुमारे २२५ लोकांचा सहभाग होता. भूज व राजकोट केंद्रांमध्ये प्रत्येकी ६० व्यक्ति उपस्थित होत्या. आमंत्रण–पत्रिका, फलक, सादरी–करणाची सामुग्री इ. १५ दिवस आधीपासून तयार ठेवण्यात आले होते. अभ्यासींच्या मित्रमंडळींमध्ये तसेच परिवारामध्ये आमंत्रण–पत्रिका वाटण्यात आल्या होत्या. सर्व निमंत्रितांच्या सोयीकरिता विश्व–प्रार्थना (युनिवर्सल प्रेयर) गुजरातीमध्ये भाषांतरित करून एका फलकावर प्रदर्शित करण्यात आली होती, ज्यामुळे ती लक्षात ठेवणे सोपे जात होते.



## इच्छाशक्तीचा वापर, मुंबई

दि. ४ सप्टेंबर रोजी मुंबई येथे इच्छाशक्तीवर आधारित एक सत्र आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये ५५ अभ्यासी सहभागी झाले होते. सत्राची सुरुवात स्वागतपर भाषणाने झाली. यानंतर गुरुदेवांप्रति एक गीत गाण्यात आले व परस्पर ओळखीचा कार्यक्रम झाला. गुरुदेवांची इंग्रजी व हिंदी भाषेतील इच्छाशक्ती या विषयावरील ध्वनीफीत व चित्रफीत यांचा या कार्यक्रमात समावेश होता. याच विषयावरील सहज–मार्गातील वाचन–सामुग्री श्रोत्यांना या वेळी देण्यात आली. यापुढे आपली साधना मन:पूर्वक करण्याचा निश्चय अभ्यासींनी केला व या कार्यक्रमाची सांगता झाली.

## दहा सूत्रांवर प्रकाशझोत– गदग, उत्तर कर्नाटक

कर्नाटकामधील हुबळीजवळील गदग येथे दहा सूत्रांवर आधारित पूर्ण दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळच्या सत्संगाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दहा सूत्रांवर आधारित संतुलित जीवन जगण्यामध्ये चारित्र्याच्या जडण–घडणीचे महत्त्व या वेळी विषद करण्यात आले. पूज्य गुरुदेवांच्या आयुष्यातील उदाहरणे देऊन प्रत्येक सूत्राबद्दल स्पष्टीकरण देण्यात आले. भोजनानंतर बालकांनी गीत सादर केले व हस्तव्यवसायाने तयार केलेल्या वस्तू प्रदर्शित केल्या. आभार–प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.



खंड ४ अंक ६ श्री राम चंद्र मिशन® नोव्हेंबर २०११
एकोज इंडिया वार्तापत्र



## राजस्थान: युवकांसाठी माहितीपर कार्यक्रम

४ सप्टेंबर रोजी जयपूर येथे राजस्थान विभागाच्या युवकांसाठी एक माहितीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निरनिराळ्या केंद्रातून सुमारे ७० युवकांनी यामध्ये सहभाग घेतला. नियुक्त केलेल्या समन्वयकांनी खालील विषयांवर सादरीकरणे प्रस्तुत केली.

- सहजमार्गाची अचूक समज काय आहे व त्याचा युवकांमध्ये कसा विकास करता येईल?
- सहजमार्गाचे युवा समन्वयक या नात्याने तुम्ही तुमच्या केंद्रांमध्ये युवकांसाठी कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करता?
- सहजमार्गाच्या वेबसाईट मध्ये उपलब्ध अशी साधन-सामुग्री
- खरगपूर व बेंगलोर येथील क्रेस्ट मध्ये होणाऱ्या युवा मेळाव्यांबद्दल माहिती

निरनिराळ्या केंद्रांमधून युवकांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये चर्चा घडविण्यासाठी, आपले विचार मांडण्यासाठी व परस्परांमध्ये बंधुभाव वाढण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. विविध केंद्रांमध्ये होणाऱ्या कार्यक्रमांच्या अनुभवांचे कथन, प्रश्नोत्तरे व काही प्रसंगोचित ध्वनि-चित्रफीतींचे प्रदर्शन या पद्धतीने हा हेतू साधण्यात आला. 'लाईफ स्पेसेस' या शीर्षकाचा एक उपक्रम सायंकाळी करण्यात आला ज्यामध्ये परिवार, व्यवसाय, मिशन व वैयक्तिक जीवन या चार अंगांमध्ये आपले जीवन कसे जगावे हे शिकता आले. सायंकाळच्या सत्संगाने या कार्यक्रमाचे समापन झाले.

सहजमार्गाची अचूक समज काय आहे व त्याचा युवकांमध्ये कसा विकास करता येईल? या विषयावर चर्चा करण्यासाठी ९ ऑक्टोबर रोजी भीलवाडा येथे युवकांचे २ तासांचे एक सत्र घेण्यात आले. सहभागी झालेल्या १० अभ्यासींनी या विषयावर आपापले मत मांडले.

अजमेरचे एक युवा समन्वयक, डॉ. सनी यांनी दि.२० ऑगस्ट ते २२ ऑगस्ट दरम्यान 'आत्म परिवर्तन' या विषयावर एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्रशिक्षक डॉ. गिकासा यांनी घरगुती वातावरणामध्ये याचे संचालन केले. प्रत्येक दिवसाची सुरुवात व सांगता सत्संगाने झाली. परिचय सत्रानंतर 'इतरांचे काय चुकत आहे आणि माझे काय चुकत आहे?' या विषयावर एक आत्मपरिक्षणाचा कार्यक्रम झाला ज्यामुळे सहभागींना हे समजले की समस्या ही बाहेर नसून आपल्यामध्येच आहे. यामधून त्या व्यक्तीच्या बऱ्याच सद्गुणांची, पूर्वी नसलेली जाणीव झाली. अभ्यासींच्या हृदयांची द्वारे उघडली गेली व समस्यांवरचे उपाय आपोआप सुचत गेले. दैनंदिनी लिहिणे यावरील एक सत्र, 'ध्येय कसे गाठाव' व 'अध्यात्मिक जीवनाची निवड' यावरील चर्चासत्रांनी साधनेकडे लक्ष देण्यावर भर दिला. या कार्यक्रमामुळे आपल्या बंधु-भगिनींना व मुख्यत्वेकरुन स्वत:ला जाणण्यामध्ये मदत मिळाली.

## शिक्षक विकास कार्यक्रम

### तिपटूर, कर्नाटक

दि. २४ व २५ सप्टेंबर रोजी, तिपटूर येथे कन्नड भाषेमध्ये दक्षिण कर्नाटकाच्या ३७ अभ्यासींसाठी 'स्पन्दन-शिक्षक विकास कार्यक्रम' ही एक रहिवासी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. मिशनचे दूत या नात्याने संस्थेची तत्वे आणि सहजमार्ग साधना पद्धती सौम्य न करता समाजापर्यंत पोहोचण्यासाठी सहभागी अभ्यासींना योग्य बनविणे हा या कार्यशाळेचे मुख्य उद्देश होता. 'प्रभावी वक्तव्य', 'अध्यात्मिक मार्गासाठी इच्छुकांना सहजमार्गाची ओळख करुन देताना सांगावयाचे अनुकूल असे मुद्दे', 'निरनिराळ्या ठिकाणी सहजमार्गाची ओळख करुन देण्याच्या पद्धती', 'शिक्षक या नात्याने स्वत:चा सतत विकास करण्याची गरज' अशा विषयांवर अनुभवी शिक्षकांनी सत्रे घेतली. सहभागींनी शिक्षकांच्या मदतीने आपापल्या गटामध्ये सांघिक प्रात्यक्षिकेही केली. काही सहभागींनी आधी दिल्या गेलेल्या विषयांवर सादरीकरणे केली. यावर तज्ज्ञगटाने वक्त्यांची शक्तिस्थळे व सुधारणा करण्याची आवश्यकता यावर टिप्पणी केली. मिशनमध्ये शिक्षक म्हणून काम करण्याच्या संधींबद्दल सहभागींना सांगण्यात आले व त्यांना आपापल्या केंद्रांमधील अधिकाऱ्यांसमवेत विचार-विनिमय करुन आपले भविष्यातील कार्यक्रम आयोजित करण्याचे सुचविण्यात आले.

सहजमार्गाचा प्रसार करण्याचा आत्मविश्वास मिळाल्यामुळे सहभागींना ही कार्यशाळा खूपच लाभदायक वाटली. गुरुदेवांच्या कार्यामध्ये सहभाग घेण्याच्या उत्साहासमवेत सहभागी आपल्या केंद्रांकडे परतले.







## चेन्नई येथे मुलांसाठी कार्यशाळा

दि. ९ आक्टोबर रोजी ८ ते १२ वयोगटातील मुलांसाठी एका हस्तकलेच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये सुमारे ९० मुलांनी उत्साहाने भाग घेतला. शक्यतो टाकाऊ वस्तूंपासून मुलांनी दिवाळी कार्ड, फोटो फ्रेम, भित्तीचित्रे, वाढदिवसांच्या टोप्या, रंगीत गॉगल इ. वस्तू बनविल्या. त्यांनी टी शर्टांवर प्रोत्साहनपर उक्ती रंगविल्या व सुंदर चित्रे काढली. मुलांनी स्वत:च्या कल्पनेने पिशव्यांवर कलात्मक चित्रे रेखाटली व निसर्गाला वाचविण्यासाठी पॉलिथिनच्या पिशव्या वापरणे टाळण्याचा संदेश दिला. मौज–मजेत मूल्ये शिकताना मुलांना आनंद झाला होता.

## तामिळनाडू येथे नवे केंद्र

दि. २८ ऑगस्ट रोजी तिरुपुर नजीक 'करुमतंपत्ती' केंद्राचे उद्घाटन केले गेले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळच्या सत्संगाने झाली. बंधू टी. व्ही. विश्वनाथराव यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणामध्ये बोलताना तिरुपुर केंद्राच्या विकासामध्ये अभ्यासींनी केलेल्या प्रयत्नांची आठवण करुन दिली व याही केंद्राच्या विकासाकरिता अशाच निष्ठेने काम करण्याची व आणखी नवीन केंद्रांच्या निर्माणाकडे वाटचाल करण्याची विनंती केली. एका ओपन–हाऊस सत्राचे आयोजन करण्यात आले व त्यामध्ये सहजमार्गाच्या विशेषतेबद्दल सांगितले गेले. याच्या परिणामस्वरूप म्हणून सहभागींमधील बऱ्याच जणांनी साधनेची सुरुवात करण्याची इच्छा दर्शविली.




## उत्तराखंड, नैनिताल येथे नवीन ध्यानकक्ष

नैनिताल येथे बऱ्याच दिवसांचे स्वप्न व आवश्यकता असलेल्या अशा ध्यानकक्षाचे दि. ४ सप्टेंबर रोजी उद्घाटन करण्यात आले. १५० जण बसू शकतील असा हा ध्यानकक्ष एका अभ्यासी बंधूच्या घराच्या वरच्या मजल्यावर आहे. याप्रसंगी एका पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये गाणी, कविता, लहान मुलांद्वारे भजने आणि एक आस्थापूर्ण भाषण सामील होते. या ध्यान कक्षाच्या समर्पणाने तेथील स्थानिक अभ्यासींमध्ये नवा उत्साह निर्माण झाला आहे.

## चारित्र्यनिर्माण, तिरुपुर

दि. १४ व १५ ऑगस्ट रोजी खास विनंतीने बंधू रवी सुब्बिअन यांनी युवकांच्या एका लहान गटासाठी तिरुपुरच्या चेट्टिपालयम योगाश्रमामध्ये 'चारित्र्य निर्माण' या विषयावर एक कार्यक्रम घेतला.

१४ तारखेला सत्संगानंतर कार्यक्रमाची सुरुवात 'आत्म–पृथ्थकरणान' झाली. प्रशिक्षणार्थींना स्व:परिक्षण करता यावे यासाठी १३ प्रश्नाचा एक संच दिला गेला आणि त्यांनी स्वत:चे चारित्र्य घडविण्यासाठी आतापर्यंत केलेले प्रयत्न देखील लिहिण्यास सांगितले गेले.



गुरुदेवांच्या या संदर्भातील उक्ती व 'व्हिस्पर्स फ्रॉम दि ब्राईटर वर्ल्ड' मधील काही समर्पक संदेशांची देवाण–घेवाण करण्यात आली. यामुळे चारित्र्य म्हणजे केवळ प्रामाणिकपणा व खरेपणा नसून जीवनाच्या प्रत्येक प्रसंगी समतोल राखण्यासाठी लागू होणाऱ्या काही मूल तत्वांचा संच आहे या गोष्टीची समज आली. गुरुदेवांनी प्रदान केलेल्या आपल्या आंतरिक अध्यात्मिक स्थितीला अनुरूप असे आपले बाह्य व्यक्तिमत्वदेखील असले पाहिजे हे देखील समजाविण्यात आले. यामुळे गुरुदेवांच्या अपेक्षेनुरुप आपण कसे बदलले पहिजे याची कल्पना आली. दि. १५ ऑगस्ट रोजी चारित्र्य घडविण्यासाठी कोणकोणत्या साधनांचा वापर करता येईल व इच्छाशक्तीच्या वापरामध्ये असफल होण्याची काय कारणे असू शकतात यांवर चर्चा झाली. त्यानंतरचे सत्र स्व:परिक्षणाचे होते ज्यामध्ये स्वत:मधील नकारात्मक गोष्टी व त्रुटींचे परिक्षण करताना सर्वांनाच हर्ष वाटला.

सहभागींना आनंद व आत्मविश्वास वाटत होता व या कार्यक्रमात जे काही शिकवले गेले होते त्यांचा वापर करण्यासाठी ते आतूर होते.


खंड ४ अंक ६ नोव्हेंबर २०११
श्री राम चंद्र मिशन®
एकोज इंडिया वार्तापत्र

# प्रकाशाची केंद्रे

## म्हैसूर आश्रम , दक्षिण कर्नाटक





म्हैसूर आश्रम हा नंजनगुड, टी. नरसीपूरा, हुन्सूर, मंड्या, मडिकेरी व पेरियापटना यासारख्या आसपासच्या केंद्रासाठी विभागीय आश्रम आहे. ओळखपत्राचे समन्वयन, प्रकाशनांचे वितरण यासारखी कामे म्हैसूर केंद्राद्वारे या इतर केंद्रांकरिता करण्यात येतात. या आश्रमाचा उपयोग विभागीय मेळावे, कार्यशाळा व अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी करण्यात येतो.

### गुरुदेवांनी आश्रमाला दिलेल्या भेटी

सन १९५०च्या दशकात म्हैसूर केंद्राची सुरुवात झाली. सन १९६५ मध्ये पू. बाबूजी महाराजांनी या केंद्राला भेट दिली व श्री. मंजूनाथ अय्यर यांच्याकडे मुक्काम केला होता. दि. १६ मार्च १९८५ रोजी गोविंद राव स्मृती सभागृह येथे साजऱ्या केलेल्या स्थापना दिवस समारोहासाठी पूज्य गुरुदेवांनी म्हैसूर केंद्राला भेट दिली होती. पुन्हा १७–१८ मे १९९५ रोजी गुरुदेवांनी म्हैसूरला भेट दिली व त्यांनी मुलाकनाडू भवन येथे सत्संगाचे संचालन केले. सन २००२ मध्ये येलवाला जवळील मैदानहल्ली रोड येथे सुमारे १६ एकर जमीनीचे अधिग्रहण करण्यात आले यापैकी आठ एकर आश्रमासाठी तर बाकीची आठ एकर अभ्यासींच्या निवासासाठी उपयोगात आणण्यात आली. दि. २ एप्रिल २००२ रोजी गुरुदेवांनी ही जमीन मिशनला अर्पण केली. सन २००५ मध्ये आणखी ३ एकर ३२ गुंठे जमीन खरेदी करण्यात आली.

त्यानंतर लगेचच, तात्पुरते ध्यानगृह, स्वयंपाकघर व कार्यालयाची खोली बांधण्यात आली. दि. १६ फेब्रुवारी २००४ रोजी हजारो अभ्यासींच्या उपस्थितीत याचे उद्घाटन करतेवेळी पू. गुरुदेव वृद्ध व तरुण पिढीचे महत्व विशद करतांना म्हणाले, "आपल्याला वृद्ध माणसे त्यांच्या शहाणपणासाठी व अनुभवासाठी हवी आहेत तर तरुण त्यांच्यातील उत्साहासाठी, आदर्शासाठी व त्यांना जे हवे ते करण्याच्या त्यांच्या क्षमतेसाठी हवे आहेत. वृद्धांनी विचार करावा व बोलावे तर तरुणांनी काम करावे."

ऑक्टोबर २००४ मध्ये पू. गुरुदेवांनी म्हैसूरला युवा कार्यशाळेच्या निमित्ताने भेट दिली. पूज्य गुरुदेव तरुणांना संबोधित करतांना म्हणाले "जेव्हा बाबूजी महाराज आम्हाला आमची प्रथम सिटींग देत असत तेव्हा ते त्याला 'बीजारोपण' असे म्हणत असत. ते त्यांचे स्वत:चे बीज आमच्या हृदयात पेरत असत. त्यामुळेच हृदयाला यौगीक संज्ञेमध्ये 'हृदयोनी' असे संबोधिले जाते. हे नवीन जीवनाचे निर्माण असते जेथे तुम्ही स्वतः तुमच्या हृदयामध्ये नवीन अस्तित्व घेऊन पुनर्जन्म घेता परंतु यासाठी तुम्ही त्या बीजाला रुजू दिले पाहिजे व त्याचे भक्ति, श्रद्धा व ध्यानाद्वारे सिंचन केले पाहिजे."

पूज्य गुरुदेवांचा कक्ष नंतर ध्यानगृहाच्या पाठीमागे बांधण्यात आला. डिसेंबर २००६ मध्ये त्यांनी आश्रमाला धावती भेट दिली व तेथे काही तास मुक्काम केला.

### आजचा आश्रम

सध्या म्हैसूर येथे सुमारे ५०० अभ्यासी आहेत यापैकी रविवार सत्संगासाठी सुमारे १५० अभ्यासी नियमीत उपस्थित असतात. सुमारे १००० अभ्यासींना सामावून घेईल असे ध्यानगृह बांधण्याची तयारी सुरु आहे. आश्रमामध्ये आंबा, पपई, पेरु यासारखी सुमारे ५०० फळझाडे लावली आहेत. तर भाजीपाला बगिचा व निसर्गरम्य अशा उद्यानाची देखभाल अभ्यासी करतात.





